# अधिसूचना

क्र२०१३/भुसं/वडगाव/सिआर-३
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कळमनुरी ता.कळमनुरी
जि.हिंगोली
दिनांकः- ३१/०३/२०१६

भुमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३.

क्र.२०१४/उ.वि.अ./भुसं/सिआर-१उपविभागीय कार्यालय कळमनुरी ज्या अर्थी भुमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(२०१३चा ३०)याच्या कलम ३च्या खंड (इ)च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना,महसूल व वनविभाग क्र.संकीर्ण ११/२०१४/प्रक्र.७७/अ-२,दिनांक १९ जानेवारी २०१५(यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.)याव्दारे असे अधिसूचित केले आहे की,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया तालुक्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात,अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्या अर्थी,उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या हिंगोली जिल्हयाचा जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमिन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी(यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे.अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.असे वाटते.ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूचि दोन मध्ये दिलेले आहे,आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये या व्दारे असे अधिसूचित करण्यात येते की,उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे; आणि ज्या अर्थी,प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे,या सोबत जोडलेल्या अनुसूचि तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्या अर्थी,सामाजिक परीणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेली आहे.

आणि ज्या अर्थी कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या अनुसुचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्या अर्थी आता,असे घोषित करण्यात येत आहे की,उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याचा दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही.किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु,उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर,जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकांस उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल; परंतु आणखी असे कि,जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडुन भरपाई दिली जाणार नाही.

तसेच,उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम ,२०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केलेल्या प्रमाणे भुमि अभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये,समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी कळमनुरी जि.हिंगोली यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक
जमिनीचे वर्णन

गावः- वडगाव तालुकाः-कळमनुरी जिल्हाः-हिंगोली

| अनुक्रमांक | गट क्र. | अंदाजित क्षेत्र(हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २९/३ | ०.०६ |
| २ | ३५/३ | ०.१२ |
| ३ | ३५/४ | ०.०८ |
| ४ | ३५/६ | ०.१६ |
| ५ | ३५/६ | ०.१६ |
| ६ | ३३/६ | ०.०७ |
| ७ | ३३/११ | ०.०४ |
| ८ | ३३/११ | ०.०३ |
| ९ | ३३/१२ | ०.०४ |
| १० | ३३/१२ | ०.०४ |
| ११ | ३३/१६ | ०.०६ |
| १२ | ३३/१६ | ०.०४ |
| १३ | ३४/२ | ०.१२ |
| १४ | ३६/१ | ०.१९ |
| १५ | ३६/२ | ०.०९ |
| १६ | ३६/७ | ०.१५ |
| १७ | ३७/१ | ०.१० |
| १८ | ३७/२ | ०.०६ |
| १९ | ३७/२ | ०.०३ |
| २० | ३७/५ | ०.०८ |
| २१ | ३८ | ०.१९ |
| एकुण संपादित क्षेत्र | | १.९१ |

अनुसूची - दोन

प्रकल्प कार्याचे वर्णनःउपरोक्त गट क्रमांकातील जमीनीचे भुसंपादन करुन पैनगंगा प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या भाटेगाव शाखा कालव्यावरील सालापुर वितरीकेच्या टेल एस्केपच्या व एम.एल.३ मौजे वडगाव कालव्याच्या कामासाठी अतिरीक्त

समाजाला मिळणारे लाभःआर्थिक,पायाभुत, सोई सुविधेत वाढ होणे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापण करण्यास भाग पाडणारी कारणे — बाधित व्यक्तीचे विस्थापण करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची - चार

सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेल्या सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :- भुसंपादन जनतेच्या पायाभुत सोई सुविधेसाठी होत असल्याने सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाचा अभिप्राय आवश्यक नाही.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल :- भुधारकाचे विस्थापण होत नसल्यामुळे प्रशासकाची नियुक्ती करणे आवश्यक नाही.उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी,कळमनुरी कार्यालयात निरीक्षण करता येईल.

दिनांक : ३१/०३/२०१६
ठिकाण : कळमनुरी.

उपविभागीय अधिकारी कळमनुरी.